# राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत
# पदभरती प्रक्रिया

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत सोबत जोडलेल्या जाहिरातीनुसार कंत्राटी रिक्त पदांची भरती करण्यात येणार आहे. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी तथा अध्यक्ष निवड समिती जिल्हा परिषद सांगली यांनी दिलेल्या आदेशान्वये कंत्राटी रिक्त पदांच्या भरतीची जाहिरात जिल्हा परिषदेच्या zpsangli@maharashtra.gov.in या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली असुन सदरचे अर्ज दि.०२/०५/२०२५ पर्यंत संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत **राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय, नवीन प्रशासकीय इमारत, ३ रा मजला, जिल्हा परिषद, सांगली** येथे प्रत्यक्ष सादर करावयाचे आहेत.

पुढील सर्व भरती प्रक्रियेची माहिती (Notification) वेळोवेळी zpsangli@maharashtra.gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी. सदर प्रक्रियेबाबत उमेद्वारांना व्यक्तिशः कळविले जाणार नाही. सर्व माहिती उमेद्वारांनी स्वतः वरील संकेत स्थळावरुन प्राप्त करुन घेणेची आहे याबाबत कोणतीही तक्रार ग्राहय धरण्यात येणार नाही.

# राष्ट्रीय आरोग्य अभियान

## जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी, सांगली

## पदभरती जाहिरात

**राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी, सांगली, मार्फत विविध कार्यक्रमांकरिता खाली नमूद पदाकरिता एकत्रित मानधनावर कंत्राटी रिक्त पदाची भरती करावयाची आहे. पदाचा तपशिल खालीलप्रमाणे –**

## तक्ता अ

| अ क्र. | पदाचे नाव | रिक्त पदे | नियुक्तीचे ठिकाण | शैक्षणिक अर्हता | प्राधान्य | प्रवर्ग | एकत्रीत मानधन |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Physiotherapist | 1 | उपजिल्हा रुग्णालय शिराळा | Physiotherapy NPHCE | | इ.मा.व.-१ | २००००/- |
| 2 | Psychologist | 1 | जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालय सांगली | MA Psychology | | अ.जा.१ | ३००००/- |
| 3 | Lab Technician | 2 | GMCH Miraj, Jath | Intermediate (10+2) and diploma or certified course in Medical laboratory technology or equivalent | 1) one year of experience in NTEP or Sputum smear microscopy 2) candidates with higher qualification (for example Graduates/ Post Graduates) shall be preferred. | ई.डब्लु.एस.-१ एस.ई.बी.सी.-१ | १७०००/- |
| 4 | Sr. Lab Technician | 2 | GMCH Miraj | 1) M.sc. Medical Microbiology / applied microbiology/ General Microbiology/ Biotechnology/ Biochemistry with or without DMLT OR 2) B. Sc Microbiology/ Biotechnology/ Biochemistry/ Chemistry/Life Science with or without DMLT | 1) Five years of work experience in TB Bacteriology 2) Three years of work experience in TB Bacteriology | वि.जा.अ.-१, ई.डब्लु.एस.-१ | २५०००/- |
| 5 | Finance cum logistics consultant | 1 | जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालय सांगली | 1) CA/Inter CA/ ICWA/ Inter ICWA 2) MBA Finance Or M.com Preferential | 1) MBA or Mcom – Minimum 2 yrs experience of working with finalization of accounts. | अनु.जा.-१ | २००००/- |
| 6 | Audiologist & Speech Therapist | 1 | जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालय सांगली | Degree in Audiologist | | खुला-१ | २५०००/- |
| 7 | Public Health Manager | 1 | UPHC Islampur | Any Medical Graduate with MPH/MHA/MBA in Health | | खुला-१ | ३५०००/- |
| 8 | Staff Nurse | 13 | SDH K.Mahankal- 4, SDH Islampur-1 RH Vita-1, RH Atpadi-1, SDH Shirala-3, RH Palus-1, RH Kadegaon-1, CS Office -1 | GNM/ B.Sc Nursing | | अनु.जमाती -२ एस.ई.बी.सी.-६, ई.डब्लु.एस.-५ | २००००/- |

# तक्ता ब

| अ क्र. | पदाचे नाव | रिक्त पदे | नियुक्तीचे ठिकाण | शैक्षणिक अर्हता | एकत्रीत मानधन |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Medical Officer (MBBS NTEP) | 2 | GMC Miraj-1<br>DTC Sangli-1 | MBBS | ६००००/- |
| 2 | Medical Officer (MBBS NPNCD) | 2 | SDH Islampur.२ | MBBS | ६००००/- |
| 3 | Medical Officer (MBBS L3) | 2 | RH Vita-1,<br>SDH K.Mahankal-1 | MBBS | ६००००/- |
| 4 | Medical Officer (MBBS SNCU/NBSU) | 2 | CS Office Sangli-2 | MBBS | ६००००/- |
| 5 | Medical Officer (MBBS NRC) | 1 | SDH K.Mahankal | MBBS | ६००००/- |
| 6 | Gynecologist | 1 | RH Jath | MD/ MS Gyn / DGO / DNB | ७५०००/- |
| 7 | Surgeon | 1 | SDH Shirala | MS General Surgery / DNB | ७५०००/- |
| 8 | Pediatrician | 2 | RH Chinchani vangi,<br>RH Atapadi | MD Paed / DCH / DNB | ७५०००/- |
| | Total | 13 | | | |

***<u>अटी व शर्ती:-</u>***

१) उपरोक्त पदे ही कंत्राटी स्वरुपाची असुन नियुक्ती ११ महिने २९ दिवसांकरिता असेल.

२) जाहीरातीतील पदे राज्य शासनाची नियमित पदे नसुन निव्वळ कंत्राटी स्वरुपातील पद आहेत. सदर पदावर कायमपणाचा हक्क राहणार नाही तसेच या पदांसाठी शासनाचे सेवा नियम लागु नाही, तसेच अर्जदाराला शासकीय नियमित सेवेत सामावुन घेणे किंवा शासनामार्फत सेवा संरक्षण किंवा त्यासंबंधी दावा करण्याचा अधिकार राहणार नाही.

३) अर्जदार हा संबंधित पदासाठी शारीरीक व मानसिकदृष्ट्या सक्षम असावा तसेच अर्जदाराविरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

४) उपरोक्त कंत्राटी पदांकरीता दरमहा एकत्रित मानधन देण्यात येईल.

५) **जाहीरातीमधील रिक्त पदांच्या संख्येत व नियुक्ती ठिकाणात बदल होऊ शकतो याबाबतचे सर्व अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. सांगली यांनी राखुन ठेवले आहेत. ऐनवेळी मार्गदर्शक सुचनांनुसार पदसंख्येत बदल झालेस त्याबाबत उमेदवारांना आक्षेप घेता येणार नाही.**

६) अनुभवी व उच्च शैक्षणिक अर्हता धारकास प्राधान्य दिले जाईल.

७) निवड प्रक्रीये दरम्यान व निवड झाल्यावरही कोणत्याही टप्प्यावर उमेदवारांची शैक्षणिक अहर्ता/अनुभव/गुन्हा याबाबत उमेदवारांने खोटी माहिती दिली/ लपवली असल्यास निदर्शनास आल्यास त्याक्षणी उमेदवारी रद्द करण्यात येईल

८) एकापेक्षा अधिक पदांसाठी अर्ज करावयाचा असल्यास उमेदवारांनी प्रत्येक पदाकरीता स्वतंत्र अर्ज सादर करावेत.

९) एकापेक्षा अधिक पदांकरीता अर्ज करताना अर्जासोबत पदांचा प्राधान्यक्रम मुलाखतीचे पुर्वी कार्यालयास सादर करावा.

10) निवड प्रक्रियेतील पात्र/अपात्र उमेदवारांची यादी, भरती प्रक्रियेची माहिती जिल्हा परिषदेच्या वेबसाइटवर zpsangli@maharashtra.gov.in प्रसिध्द करणेत येईल याबाबत कुठलाही स्वतंत्र पत्रव्यवहार उमेदवारांसोबत केला जाणार नाही.

11) निवड यादीतील गुणाक्रमांकाचे आधारे प्राधान्यक्रमाने पदस्थापना दिली जाईल. त्याबाबत उमेदवाराने कोणत्याही दबावतंत्राचा वापर केल्यास सदर उमेदवाराची निवड रद्द करण्यात येईल.

12) जाहीरातीच्या दिवशी सदर पदासाठी कमाल वयोमर्यादा अराखिव प्रवर्गासाठी 38 वर्षे व राखीव प्रवर्गासाठी 43 वर्षे राहील. तसेच एनएचएम अंतर्गत काम कलेल्या अथवा करीत असलेल्या उमेदवारांना ५ वर्षे वयोमर्यादा शिथील राहील. वैद्यकीय अधिकारी एमबीबीएस या पदासाठी शासकीय कर्मचारी असेल तर वयाची ७० वर्षे पर्यंत अर्ज करू शकतो त्या अर्जदारास जिल्हा शल्य चिकीत्सक अथवा मेडिकल बोर्ड यांचे प्रमाणपत्र सदर करणे बंधनकारक असेल.

13) उपरोक्त पदांकरीता निवड प्रक्रिया ही प्राप्त अर्जाच्या संख्येनुसार छाननी करुन **गुणानुक्रमे** यादी तयार करण्यात येवुन गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल. निवड समितीचा निर्णय अंतिम राहिल.

14) अर्जदाराला कंत्राटी कालावधीमध्ये सोयीनुसार ठिकाण बदलुन मिळण्याची मागणी करता येणार नाही.

15) उपरोक्त पदांपैकी तांत्रिक पदांकरीता तत्सम कौन्सिलचे रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक राहील, अन्यथा उमेदवारास अपात्र ठरविणेत येईल.

16) भरती प्रक्रिया स्थगित करणे रद्द करणे पदभरती प्रक्रियेत बदल करण्याचे सर्व अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्तरावर राखिव ठेवण्यात आलेले आहेत, याबाबत कोणालाही कोणताही दावा करता येणार नाही.

17) उमेदवाराने विहीत नमुन्यातील अर्ज, गुणपत्रिका व आवश्यक कागदपत्रांच्या छायांकीत सत्यप्रतींसह आपले अर्ज ऑफलाईन पदधतीने दि. 23/04/2025 ते दि. 02/05/2025 रोजी संध्याकाळी 05.00 वाजेपर्यंत राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय, नवीन प्रशासकीय इमारत, ३ रा मजला, जिल्हा परिषद सांगली येथे प्रत्यक्ष सादर करणेचे आहेत. प्रक्रिया शुल्क अधिक शासकिय कर अदा केल्यानंतरच उमेदवारांचा अर्ज भरती प्रक्रियाकरिता गृहित धरणेत येईल.

18) सदर भरतीची प्रक्रिया पुर्ण झालेनंतर भविष्यात जर एखाद्या ठिकाणी कर्मचारी यांनी राजीनामा दिलेमुळे जागा रिक्त झालेस प्रतिक्षा यादीतील मेरिटमधील पुढील उमेदवारास नविन भरती प्रक्रिया न करता नियुक्ती आदेश दिले जातील. सदर अंतिम निवड यादी ही तयार झालेनंतर वेबसाइटवर प्रसिध्द झालेनंतर पुढील एक वर्षापर्यंत वैध राहील.

19) सदर भरती प्रक्रिये करीता अर्ज दि. 02/05/2025 पर्यंत राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय, नवीन प्रशासकीय इमारत, ३ रा मजला, जिल्हा परिषद सांगली येथे कार्यालयीन वेळेत (शासकिय सुट्टी वगळता) प्रत्यक्ष स्वीकारले जातील तदनंतर अर्जाची छाननी करुन उमेदवारांची पात्र/ अपात्र यादी इ.बाबत सविस्तर तपशिल वेळोवेळी पुणे जिल्हा परिषदेच्या वेबसाईटर zpsangli@maharashtra.gov.in प्रसिध्द करणेत येईल. तसेच इतर कोणत्याही पध्दतीचा अवलंब करणेत येवू नये याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. याबाबत पुनश्च वर्तमानपत्रामध्ये जाहीरात दिली जाणार नाही.

20) उमेदवारांना वेळोवेळी दिल्या जाणाऱ्या सर्व सुचना, गुणवत्ता यादी, कार्यालयीन सूचना जिल्हा परिषदेच्या वेबसाईटवर प्रसिध्द करणेत येतील.

21) वरील सर्व पदे हि केवळ कंत्राटी स्वरुपाची आहेत. ज्या योजनेंअतर्गत वा अभियान अंतर्गत (जसे NHM, 15FC) सदरील पदे भरण्यात येतील त्याबाबत भविष्यात योजना /अभियान बंद करणेबाबत निर्णय झाल्यास हि पदे संपुष्टात येतील याबाबतीत कुठल्याही प्रकारचा दावा उमेदवारास करता येणार नाही.

22) तक्ता अ मधील नमूद केलेल्या सर्व पदांसाठी पात्र उमेदवार यांचेकडून विहित नमुन्यात अर्ज मागवून घेऊन तक्ता क नुसार पदभरती प्रक्रिया राबविण्यात येणार असून तक्ता ब मधील पदांकरिता प्रत्येक महिन्याच्या १ व १५ तारखेस या कार्यालयाकडून थेट मुलाखती घेण्यात येऊन तसेच सार्वजनिक सुट्टी असल्यास त्याच्या दुसऱ्या दिवशी थेट मुलाखती घेण्यात येतील व थेट मुलाखतीद्वारे पदभरती करण्यात येणार आहे.

## तक्ता क

**राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत विविध पदांच्या पदभरतीच्या अनुषगाने राबविणेची प्रक्रिया पात्र उमेदवारांना पुढील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे गुण देण्यात येणार आहेत.**

| विवरण | तपशील | अधिकतम गुण |
|---|---|---|
| पदासाठी आवश्यक Qualifying exam मधील गुण (अंतिम वर्षाच्या गुणाच्या आधारे) | मिळालेल्या एकुण गुणांच्या टक्केवारीचे 50 प्रमाणे Proportion काढावे. (उदा. 60% गुण प्राप्त असल्यास त्याचे 50% प्रमाणे Proportion = 60*50/100=30) | 50 गुण |
| पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हतेपेक्षा अधिक शैक्षणिक अर्हता असल्यास (संबंधित विषयामध्येच अधिकची शैक्षणिक अर्हता असल्यास विचारात घ्यावी. | अधिकतम 20 गुण द्यावेत.<br>मिळालेल्या एकुण गुणांच्या टक्केवारीचे 20 प्रमाणे Proportion काढावे (उदा. 1. Staff Nurse पदाची आवश्यक शैक्षणिक अर्हता पूर्ण करुन अतिरिक्त B.Sc (Nursing) हि शैक्षणिक अर्हता पूर्ण केलेल्या उमेदवाराने अर्ज केला असल्यास उमेदवारांस B.Sc (Nursing) च्या अंतिम वर्षात 60% गुण प्राप्त असल्यास त्याचे 20% प्रमाणे Proportion =60*20/100=12 गुण) | 20 गुण |
| संबंधित पदाशी निगडीत अनुभव | प्रत्येक 1 वर्षासाठी 6 गुण द्यावेत. (1 वर्षाकरिता 6 गुण, जास्तीत जास्त 30 गुण) | 30 गुण |
| तक्ता ब मध्ये नमूद केलेल्या थेट मुलाखत पदाकरिता गुणांकन पद्धत | Subject Knowlegde 10 Mark, Research & Academic Knowledge 10, Leadership Qulaity 10, Administrative Ability 10, Expereince 10,<br>A) For Govt. Experience 2 Mark for one Year,<br>B) For Private Experince 1 Maark for one Year<br>Total Experience 10 mark Maximum | 50 गुण |

1. यानुसार गुणांकन केल्यावर गुणानुक्रमांनुसार अधिकतम गुण मिळालेल्या उमेदवारांची गुणवत्ता यादी संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येईल. सदर यादीबाबत आक्षेप असल्यास ते सादर करण्याकरीता पाच दिवसाची मुदत देणेत येईल. आक्षेपसोबत त्यांच्या पृष्टयर्थ योग्य पुरावे सादर करण्यास सुचित करणेत येईल.
2. अशा प्रकारे प्राप्त आक्षेपांचे निराकरण करुन त्यानुसार अंतिम गुणवता यादी तयार करणेत येईल व ती जिल्हा परिषद, सांगली या वेबसाईटवर प्रसिध्द करणेत येईल, व त्यानुसार नियुक्ती आदेश देण्यात येतील.
3. ज्या पदांकरीता कौशल्य चाचणी अनिवार्य करण्यात आली आहे त्या पदांकरीता पात्र उमेदवारांस नियुक्ती आदेश देण्यापूर्वी त्याची जिल्हास्तरावर कौशल्य चाचणी घेण्यात येईल. सदर कौशल्य चाचणीमध्ये सदर उमेदवार पात्र ठरल्यास त्यास नियुक्ती आदेश देण्यात येतील अन्यथा नाही.
4. नियुक्ती आदेश दिलेल्या उमेदवारांना रुजू करुन घेण्यापूर्वी सर्व आवश्यक प्रमाणपत्रे, शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्रे इतर *आवश्यक का*गदपत्रे यांची तपासणी व खात्री करण्याची जबाबदारी संबंधित संस्था प्रमुख यांची राहील.

६. भरतीप्रक्रिये संदर्भातील मार्गदर्शक सुचना वेळोवळी जिल्हा परिषद, *सांगली* या वेबसाईटवर प्रसिध्द करणेत येतील, कोणत्याही उमेदवाराने जिल्हा कार्यालयास प्रत्यक्ष संपर्क साधु नये.

७. उपरोक्त पदसंख्येत व पदांच्या ठिकाणांमध्ये ज्या त्या परिस्थितीनुरूप बदल होण्याची शक्यता असते. त्या संबधित *सर्व अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्तरावर राखिव ठेवण्यात आलेले आहेत, याबाबत कोणालाही कोणताही दावा करता येणार नाही.*

❖ *खालीलप्रमाणे आवश्यक असलेल्या मुळ कागदपत्रांच्या साक्षांकीत केलेल्या छायांकीत प्रती अर्जाच्या सोबत जोडाव्यात.*

| | |
|---|---|
| 1) *शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे व गुणपत्रिका* | 2) *राखीव उमेदवारांनी जातीचे प्रमाणपत्र* |
| 3) *शाळा सोडल्याचा/ जन्म तारखेचा दाखला* | 4) *प्रमाणित केलेले अनुभव प्रमाणपत्रे* |
| 5) *पासपोर्ट आकाराचा फोटो* | 6) *शासकीय अनुभव असलेस अनुभव दाखला* |
| ७) *लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र* | 8) *नावात बदल असलेस गॅजेट (राजपत्र) जोडणे* |

**सही/-**
**सदस्य सचिव निवड समिती**
**तथा जिल्हा आरोग्य अधिकारी**
**जिल्हा परिषद, सांगली**

**सही/-**
**अध्यक्ष निवड समिती**
**तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद, सांगली**

# अर्जाचा नमुना

............. या पदासाठी अर्ज

| |
|---|
| पासपोर्ट आकाराचा उमेदवाचा नजीकचा साक्षांकित फोटो |

प्रति,
**मा.जिल्हा आरोग्य अधिकारी,**
**तथा सदस्य सचिव,**
**जिल्हा एकात्मिक आरोग्य व कु.क.सोसायटी,**
**जिल्हा परिषद, सांगली**

| संपूर्ण नाव | मराठी | इंग्रजी (कॅपीटल लेटर) |
|---|---|---|
| १) आडनाव | ...................... | ...................... |
| २) स्वत:चे नाव | ...................... | ...................... |
| ३) वडिलांचे/पतीचे नाव | ...................... | ...................... |

४) पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता
पिनकोडसहीत . ..............................................................................................
..............................................................................................
५) ईमेल आयडी ..............................................................................................
६) दूरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक ..............................................................................

७) जन्मतारीख :-

| तारीख | महिना | वर्ष |
|---|---|---|
| | | |

आजअखेर वय

| वर्ष | महिना | दिवस |
|---|---|---|
| | | |

८) खाली नमूद केलेल्या प्रवर्गासाठी लागू असलेल्या चौकटीमध्ये (✓) अशी खूण करावी.

| अ.जा. | अ.ज. | वि.जा.अ. | भ.ज.(ब) | भ.ज. (क) | भ.ज.(ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व. | एसईबीसी | ईडब्ल्युएस | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| SC | ST | VJ-A | NT-B | NT-C | NT-D | SBC | OBC | SEBC | EWS | Open |
| | | | | | | | | | | |

९) शैक्षणिक अर्हता

| अ.क्र. | उत्तीर्ण केलेली परीक्षा | विद्यापीठ/मंडळाचे नाव | परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | टक्केवारी | श्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |

१०) संबंधित पदाविषयीचा अनुभव

| संस्थेचे नाव व पत्ता | कालावधी | | एकुण वर्ष |
|---|---|---|---|
| | पासून | पर्यंत | |
| | | | |

११) अर्जासोबत खालील (छायांकित) सत्यप्रती जोडलेल्या आहेत.
१) ................................... २)................................. ३) .........................

४) ................................... ५)................................. ६) .........................

मी असे प्रमाणित करतो/करते की, वर नमूद केलेली माहिती खरी असून, ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करणेत येईल आणि माझे विरुध्द कायदेशीर कारवाई होईल याची मला जाणिव आहे.

**दिनांक :** **अर्जदाराची सही**
**ठिकाण :** **नाव................**

**लहान कुटूबांचे प्रमाणपत्र -नमुना**

मी श्री/श्रीमती/कुमारी---------------------------------------------------------------------------------------
श्री--------------------------------------------------------------------------यांचा/यांची मुलगा/मुलगी /पत्नी
वय----------- वर्ष, राहणार-----------------------------------------------------------------याव्दारे
पुढील प्रमाणे असे जाहीर करतो/करते की,

1) मी--------------------------------------------------------या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

2) आज रोजी मला -----------(संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक 23 जुलै 2020 यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ----------- इतकी आहे. (असल्यास जन्म दिनांक 1) / /
2) / /

3) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक 23 जुलै 2020 व तदनंतर जन्माला आलेल्या, मुलामुळे शासकिय नियमानुसार मी या पदासाठी अपात्र ठरेल यांची मला जाणीव आहे.

ठिकाण - पुणे
दिनांक- / /

अर्जदार स्वाक्षरी -
अर्जदाराचे नाव-